# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

- **जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्या अंतर्गत जनजागृतीपर मनोरंजनात्मक कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडला**

५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घकचरा व्यवस्थापन विभाग अंतर्गत **Ending Plastic Pollution Globally** म्हणजेच जागतिक प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन कार्यक्रम भारतरत्न गानसम्राज्ञी स्व. लता मंगेशकर नाट्यगृह येथे मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सफाई कर्मचा-यांसाठी क्षमता बांधणी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त OSD, पर्यावरण तज्ज्ञ श्री. आनंद जगताप व श्री. सतिश भोसले यांनी या कार्यशाळेत प्रशिक्षण दिले. यानंतर मिरा भाईंदर शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवणारे स्वच्छता निरिक्षक अनिल राठोड, नितीन खैर, श्रीकांत पराडकर व सफाई कर्मचारी यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. **जागतिक प्लास्टिक पिशवीचे निर्मूलन** थीम असणाऱ्या या कार्यक्रमात प्लास्टिक बंदी विषयी जनजागृती करून प्लास्टिकला पर्याय म्हणून असणाऱ्या THAILA BAG उदघाटन करून वाटप करण्यात आले. आजच्या दिवशी मिरा भाईंदर शहरातील नागरिकांसाठी स्वच्छ स्टार रँकिंग स्पर्धेचा शुभारंभ केला असून ३१ जुलै 2025 पर्यंत ही स्पर्धा असणार आहे. तसेच लवकरच मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे प्लास्टिक मुक्त मिरा भाईंदर हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. आजच्या या क्रार्यक्रमात रुबीक्स क्युब वापरुन कलाकार एनी आणि अँथॉन यांनी ग्लोबल बीट प्लास्टिक पोल्युशन नावाच अनोख पोस्टर बनविले तसेच जागतिक प्लास्टिक पिशवी निमुर्लन या थीमला घेऊन कलाकरांनी एक उत्तम असा नुत्याविष्कार सादर करुन उपस्थितीत लोकांची मने जिंकली.

तसेच, मिरा भाईंदर महानगरपालिका रिल स्पर्धेतील स्पर्धकांना मा. आयुक्त सो., अतिरिक्त आयुक्त यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. त्याचबरोबर पर्यावरणाचा सध्यास्थितीचा अहवाल 2023-24 आणि आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा मा. आयुक्त, अतिरिकत् आयुक्त् व इतर मान्यवरांच्या हस्ते प्रसिद्ध करण्यात आला. यानंतर मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्तांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सगळ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच आजच्या दिवशीच फक्त वृक्षारोपण न करता रोजच वृक्ष रोपण करून त्यांचे संगोपन आणि संवर्धन केले पाहिजे. तसेच प्रत्येक नागरिकाने आपली सामाजिक जबाबदारी समजून पर्यावरण पूरक काम करुन मिरा भाईंदर महानगरपालिकेला शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त यांनी केले.

"मिरा-भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली 'मेकिंग द डिफरन्स (MTD)' व 'जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (GIC-Re)' यांच्या संयुक्त विद्यमाने मीरा-भाईंदरमध्ये कचरा विलगीकरण जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचा उद्देश स्रोतावर १००% कचरा विलगीकरण साध्य करणे आहे. वॉर्ड क्रमांक १०, ११ आणि १२ मध्ये पायलट प्रकल्प म्हणून ही मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत ३८,६०४ घरे व ४,५४५ व्यावसायिक आस्थापना समाविष्ट आहेत. २,५०० ड्युअल डस्टबिन्सचे वाटप करून ओला व सुका कचरा वेगळा टाकण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. २५ कंपोस्टिंग टंबलर सोसायट्यांमध्ये बसवले असून त्यामुळे घरगुती कंपोस्टिंग व सेंद्रिय खत निर्मितीला चालना मिळत आहे. सुका / ओला कचरा संकलनासाठी इलेक्ट्रिक टेम्पो कार्यान्वित करण्यात आला आहे. शहरातील महत्त्वाच्या ३० ठिकाणी स्टीलचे ट्विनबिन्स बसवण्यात आले आहेत. ह्या उपक्रमामुळे मीरा-भाईंदरमध्ये शाश्वत कचरा व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण होत आहे."

आजच्या या कार्यक्रमाला आयुक्तांसह अति. आयुक्त डॉ संभाजी पानपट्टे, प्र. अतिरिक्त आयुक्त डॉ सचिन बांगर, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त OSD, पर्यावरण तज्ज्ञ श्री. आनंद जगताप, सतिश भोसले, मेकिंग द डिफरन्सचे संचालक दीपक विश्वकर्मा मनपा अधिकारी, स्वच्छता निरिक्षक, सफाई कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.